# अनुभूती देवत्वाची

धुंडाळण्या देव, बाहेर उठाठेव
सर्वांनाच चेव, भरला जसा ॥ १॥

हठयोग करिती, ब्रह्मचर्य पाळिती
कामनांचे तांडव, शमले नसे ॥ २ ॥

कपडे बदलती, भगवे घालती
परि मनाची गती, शमली नसे ॥ ३ ॥

मांडी ते घालती, ध्यान ते करिती
परि समज साक्षीत्वाची, अंतरी नाही ॥ ४ ॥

मंदिरी ते जाती, गुरुसी भजती
परि मनाच्या खेळांची, जाणीव नसे ॥ ५ ॥

पोथी ते वाचती, पारायणे करिती
परि मनाची भ्रमंती, जशीच्या तशी ॥ ६ ॥

अन्नछत्र चालविती, दानधर्म करती
परि वासना पुण्याची, गेली नसे ॥ ७ ॥

सर्व वासनांची समाप्ती, मनाची गच्छंती
देवत्वाची अनुभूती, तेथे असे ॥ ८ ॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# अमृताचा बोध अमृताला

अमृततत्त्व प्रकटले, माझ्या या अंतरात
न्हाऊ कशाला सांगा, मी तीर्थ संगमात ॥१॥

मी आणि परमात्मा, अभिन्नता वसली जेथे
करावया वंदन, भक्त उरला तो कोठे ॥२॥

आता न उरली पूजा, न उरले ते पारायण
अंतरी तो अनुभवला, मीच जो नारायण ॥३॥

आता सकल विश्‍व, मीच जो जाहला
सर्वत्र मीच असता, हिणवू कसा कुणाला ॥४॥

आता संपली उपासना, नी संपले ते ध्यान
अवघे विश्‍व ते विरले, उरले अनंत अवधान ॥५॥

आता संपले भटकणे, अविद्येत जीव घेऊन प्रकटणे
जन्म मृत्यूचे ते भास, आता न उरले अंतरात ॥६॥

सत्संग जिवनात आला, परीसाचा स्पर्श झाला
ध्यान फलित होता, बोध अमृताचा अमृतास झाला ॥७॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# सत्संग

अद्वैत जाणोनी , द्वैत ते पहावे
यापरी समज, दुजी नाही || १ ||

आहे मी विश्व, अंतरंगी जाण
लटिकेच घडे भोगणे, मी-तू पण || २ ||

ना इंद्रियांची पकड, ना मीपणाची अकड
सत्संगाची ज्योत, अखंड वसे || ३ ||

भ्रमित या जगी, जाणोनी रहाणे
त्यासारखी युक्ती, दुजी नाही || ४ ||

जग ते पहावे, मनीच हसावे
योग्य वेळ येता बोलावे, ध्यान ज्ञान || ५ ||

ज्ञान ज्ञान म्हणोनी, आळवती सर्व
ज्ञानाचा तो अर्थ, ज्ञानासीच ठावा || ६ ||

करण्या ज्ञानाचा प्रसार, आसुसले सर्व
अज्ञानाचा वावर, अखंड येथे || ७ ||

येथे ज्ञानी तो अज्ञानी, अज्ञानी तो ज्ञानी
ज्ञानाचा तो अर्थ, विरळा जाणे || ८ ||

ज्ञानाचा प्रसाद, सत्संगाचा परिपाक
जगी अन्य दुजा, विधी नाही || ९ ||

❖ ❖ ❖



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# राज्य समाधीचे

विसरुनी स्व-स्वरुप, विश्व होऊनी प्रकटतो
त्या माझ्या 'मी'ला, मी नमस्कार करतो ॥१॥

माझ्याच लीला, मी स्वयेंचि पहातो
अद्वैत अनुभवून, द्वैतही भोगतो ॥२॥

मुळी मी एकत्व, जो अनेकत्वात प्रकटतो
माझ्याच कल्पनांनी, मी मला विसरतो ॥३॥

माझे मला विस्मरण, मूळ जे आकांत कारण
मीच मांडला आकांत, आणी मीच तो पाहतो ॥४॥

माझीच कीव जेव्हा, माझी मलाच येते
गळता मनपिसारा , जाग मला येते ॥५॥

गळणे मनपिसाऱ्याचे , सूत्र जागृतीचे
अन्यथा हे विश्व, फळ जे विस्मृतीचे ॥६॥

जगी खूप फैलो, सूत्र जागृतीचे
अनुभवो विश्व मात्र , राज्य समाधीचे ॥७॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# आपलीच गाठ आपुल्याशी

देह ती माती, दु:खाची वसती
देहाशी तादात्म्य, दु:ख असे ॥ १ ॥

मनाच्या त्या भ्रमी, जगाचा पिसारा
जग आणि मन, भिन्न नसे ॥ २ ॥

संताच्या संगती, तुटे भ्रमाची भ्रमंती
जीव आणि भ्रम, भिन्न नसे ॥ ३ ॥

संताची ती भेट, भ्रमाची सांगता
संताची भेट, पुण्यवंता ॥ ४ ॥

ज्ञाना आणि तुका, इथेच भेटती
हरिशीही गाठ, याच चित्ती ॥ ५ ॥

जग, देह आणि मन, तुटता तीन भ्रम
आपुलीच गाठ, आपुल्याशी ॥ ६ ॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# अंतरासी विचारा

अस्तित्व अवघे, कल्पनाचि असे रे
दिसते भासते, परि ते नसे रे ॥ १ ॥

कल्पनेचा अद्‌भुत, डाव हा पसारा
कसा काय तो, अंतरासी विचारा ॥ २ ॥

आपसूक चाले हा, अस्तित्व डोलारा
भरीव भासतो, जो पोकळीचा नगारा ॥ ३ ॥

अस्तित्व नि अहंता, भिन्नता नसे रे
तुटता अहंता, अभिन्नता वसे रे ॥ ४ ॥

अहंता अवघी, मनाची कल्पना
मनाचे मनाशी, गूढ द्वंद्व नाना ॥ ५ ॥

विरता द्वंद्वता, अनंता उरे रे
मिटता अहंता, प्रश्न तो सुटे रे ॥ ६ ॥

कल्पनेचा अद्‌भुत, डाव हा पसारा
कसा काय तो, अंतरासी विचारा ॥ ७ ॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ज्ञान

देह अभिमान, जळो ते रे मन
घडो दर्शन, दर्शनाते ॥ १ ॥

स्वरूप अज्ञान, तेचि असे मन
मी-तूपणा कारण, जे रे असे ॥ २ ॥

त्याग रे ते मन, मग होई ज्ञान
घडेल ज्ञान, ज्ञानाला रे ॥ ३ ॥

ज्ञानाचे होता ज्ञान, तुटते बंधन
नसे ज्ञानाविण, येथे काही ॥ ४ ॥

जगाची उत्पत्ती, ज्ञानातून झाली
ज्ञानाचे अज्ञान, अविद्या रे ॥ ५ ॥

कसे सांगू तुला, शब्दी ते रे नसे
अविद्या आणी मन एकचि रे ॥ ६ ॥

अविद्या आणि मन, दु:खाची ती खाण
गळता दोघेजण, भेटे जीवा शिव आपसूक ॥ ७ ॥

प्रज्ञा तेचि ज्ञान, आत्मा तेचि विज्ञान
चेतना जाणीव देव नि ब्रह्म भिन्न नसे ॥ ८ ॥

❁ ❁ ❁


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# अनुभूती

उपनिषदांचे सार, वेदांची विभूति
तैसी ती अनुभूती, स्वयंस्थित ॥ १ ॥

प्रकृतीचा जो खेळ, मनाचे ते चाळे
अस्तित्वामाजी अनुभूती, नित्य अढळ ॥ २ ॥

अखिल चराचर नि, अवघे प्राणी मात्र
प्रकृती मूलतत्त्व, अनुभूती वसे ॥ ३ ॥

भवचक्राचे कारण, अहंकार जो धारण
त्यांचे निराकरण, तत्त्व अनुभूती ॥ ४ ॥

जीवाचे जीवपण, सर्व दुःखाचे कारण
त्याचे होय आकलन, अनुभूती येता ॥ ५ ॥

अनुभूतीचे प्रकटन, संतांचे संगती
अस्तित्व आकलन, गुरुकृपा ॥ ६ ॥

❁ ❁ ❁


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# अर्थ अस्तित्वाचा

जेव्हा अयाचित डोळे उघडले
शब्दांचे ते अर्थ बदलले ॥ १ ॥

शब्दांच्या त्या अर्थ बदलण्यात
मग जगण्याचेही संदर्भ पलटले ॥ २ ॥

आता जगण्याचा अर्थ समजला
मृत्यूचाही मृत्यू पाहिला ॥ ३ ॥

आता दृष्टि स्पष्ट जाहली
धम्माची ती खेळी समजली ॥ ४ ॥

दृष्टि बंधने गळून पडली
यथाभूत ती पाहू लागली ॥ ५ ॥

पाहण्या पाहण्यातच रंग वितळले
पंचस्कंधांचे विघटन घडले ॥ ६ ॥

त्या विघटनातच बोध उगवला
चित्तधारेचा खेळ पाहिला ॥ ७ ॥

अस्तित्वाचा अर्थ समजला
अनंत काळाचा संघर्ष संपला ॥ ८ ॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# संपला खेळ शोधाचा

जसे उघडले कान, कानी पडला गोंगाट
जो तो म्हणे हेचि सत्य, अवघा गोंधळाचा थाट
घेतला शोध संप्रदायाचा, अवघ्या गोलगोल वाटा
भेटला सदगुरु त्याने हाणला, मी पणावर सोटा
बरं झालं बघा, उघडलं डोळं
भेटला सद्‌गुरू, संपला शोधाचा तो खेळ ॥ १ ॥

अवघा मनाचा हा खेळ, जसं माकोडीचं जाळं
माकोडीच विणी त्याला, आणि माकोडीच काळ
मन माकोडीच्या खेळात, जागा रे बंधूंनो सकळ
येई जाग तुटे जाळं, संपे भ्रमाचा तो खेळ
बरं झालं बघा उघडला डोळं
भेटला सद्‌गुरु, संपला शोधाचा तो खेळ ॥ २ ॥

सद्‌गुरु म्हणे, घे रे शोध, कसा उगवे मी-पणाचा तो खेळ
शोधतांना मी-पण, संपला मी-पणाचा तळ
आढळलं मी-पण, जसं स्वप्नातलं मृगजळ
मी-पणाची जाणीव, विज्ञान संज्ञा वेदनेचा खेळ
बरं झालं बघा, उघडला डोळं
भेटला सद्‌गुरू, संपला शोधाचा तो खेळ ॥ ३ ॥

मी-पणाचा भ्रम, अवघ्या दु:खाचे ते मूळ
मी-पणात बळकटे, तो संज्ञा - वेदनेचा मेळ
पंचस्कंधांचा खेळ, अवघ्या भूल भुलय्याचे मूळ
घे रे उमजून मना, अवघा चित्तधारेचा तो खेळ
बरं झालं बघा, उघडलं डोळं
भेटला सद्‌गुरु, संपला शोधाचा तो खेळ ॥ ४ ॥

❋ ❋ ❋


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# शिकवण मुक्तांची

तयासी अनुभवण्या, मन निरुपयोगी
बुद्धीचा भोगी, भ्रमिष्ठ तो जोगी ॥ १ ॥

तयासी जाणण्या, चित्त असमर्थ
विज्ञानाच्या परे, असणे त्याचे ॥ २ ॥

स्मृती आणि कल्पना, भ्रमविती जना
तयासी रमणे, नरक यातना ॥ ३ ॥

तयाचे अस्तित्व, शब्दांच्या पलीकडे
पश्यंती मध्यमा, वैखरी तोकडे ॥ ४ ॥

अज्ञानाची संगत, अहंकाराशी साकडे
ग्रंथ परंपरा पद्धती, यासीं त्याचे वाकडे ॥ ५ ॥

जयासी लागला, आत्यंतिक वेध
तोच जाण योग्य, त्याच्या भेटी ॥ ६ ॥

हृदयात ऐसी, लागत असे आग
बेहोशी जाऊन मग, येत असे जाग ॥ ७ ॥

बहोशीचे ते जाणे, नसे योगायोग
जन्मोजन्मीची आस, तेव्हा घडे योग ॥ ८ ॥

जन्मजन्मांतरीची तपस्या, येत असे फळा
मुक्तांची संगत, मरण सोहळा काळाचा ॥ ९ ॥

मुक्तांची संगत, मुक्तीची ती रीती
मी-पणाचे मरण, मुक्तचि शिकवती ॥ १० ॥

❁ ❁ ❁


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# अस्तित्व शृंखला

कसे वर्णू या अस्तित्वाला
कसे वर्णू या माझ्या 'मी' ला ॥ १ ॥
वर्णन अवघे असत्य ठरते
शब्दी कधी का सत्य उतरते ॥ २ ॥
शब्दापलीकडील विश्व ते मनोरम
महदाकाशी प्रकटे चमचम ॥ ३ ॥
या चमचमण्या असंख्य नांवे
जसे भावले तसेच गावे ॥ ४ ॥
कुणी संबोधिले ईश्वर त्यासी
कुणा ठायी ते ब्रह्म असे ॥ ५ ॥
कुणी वर्णिले बिंदुस्वरूप ते
कुणा ठायी अष्टकलाप पुरते ॥ ६ ॥
कुणी संबोधली समष्टी त्यासी
कुणासाठी ते अंगुष्ठप्रमाण ॥ ७ ॥
कुणी वर्णिले दर्शनस्वरूप ते
कुणासाठी ते ज्ञान असे ॥ ८ ॥
कुणी वर्णिती आकाशस्वरूप सत्य ते
कुणी चैतन्य, अनंत नि अमर्याद ॥ ९ ॥
कुणा ठायी ते तारे लक्ष लक्ष
कुणासाठी अनंत अवकाश ॥ १० ॥
आता मजला सांगा तुम्ही हो
आढळे का कोठे सूक्ष्म विरोधाभास ॥ ११ ॥
एकच अनुभूती नि एकच वस्तू ती
अनेक व्याख्या जगी पसरती ॥ १२ ॥
अहम ब्रह्मास्मि भावित होतसे
'तत्त्वमसि'चा अर्थ प्रकटतसे ॥ १३ ॥
आता न कुणी तो परका उरला
मी-तू-पणाचा भाव तो विरला ॥ १४ ॥
आता अवघा संशय फिटला
चित्तधारेचा खेळ उमजला ॥ १५ ॥
आता फक्त उरले बघणे
अस्तित्व शृंखलेत जाणीव होणे ॥ १६ ॥

❀ ❀ ❀


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# आंतरीक प्रवास (विपश्यना)

निर्विकल्पपणे जे जे देखिले
ते आपणहून नाहीसे झाले
पहा कैसा चमत्कार झाला
पाहता आपणच आपल्याला ॥ १ ॥

प्रथम पाहिले श्वासाला
छोटा मोठा आला गेला
पाहता पाहता मंद झाला
शेवटी न सापडला पाहू जाता ॥ २ ॥

मग बारी वेदनेची आली
सुखद दु:खद संवेदना प्रकटली
पाहता तिजला निर्विकल्पपणे
कोठे गेली कोण जाणे अचानक ॥ ३ ॥

मग प्रकटले निमित्त
भयावह ते असली दृश्य
निर्विकल्पपणे तया पाहता
त्याचीही मग झाली सांगता ॥ ४ ॥

मग उभारली सुंदर दृश्ये
विविध रंग वि विविध छटा त्या
कधी न देखिल्या या जन्मी त्या
निर्विकल्प निरीक्षणात त्याही गेल्या ॥ ५ ॥

मग अचानक फुगाच फुटला
पाया खालचा आधार गेला
शरीर मनाचा संबध तुटला
आणि जाहलो मी चिदाकाश ॥ ६ ॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

चिदाकाशी मग निर्विकल्प राहता
अनंत तत्त्व ते मग अवतरले
महदाकाशाचे आगमन झाले
आता मीच होतो महदाकाश ॥ ७ ॥

अगदीच अनोखा अनुभव होता
धम्माची ती अंतिम सत्ता
अष्टकलापांचा समुदय होता
आणि स्वस्वरूपाचा अंतिम पत्ता ॥ ८ ॥

स्वस्वरूप अनुभवत मन विरते झाले
दीर्घ श्वास घेत मग पुन्हा जागले
डोळे उघडता पुन्हा आढळले
पंचेद्रियांच्या विळख्यात ॥ ९ ॥

अशी विपश्यना भावित झाली
धम्मगिरीवर करुणा बरसली
धम्माची ती खेळी उमजली
बुद्धाची ती करुणा पावली ॥ १० ॥

❁ ❁ ❁


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# निजबोध

खूप शोधले त्या 'मी' ने 'मी' ला
कुठे न आढळला तो ॥ १ ॥

कुणी घडवला कसा घडवला
खूप अचंबा पडतो ॥ २ ॥

इथे शोधला तिथे शोधला
शोधूनी पहाता विरघळूनी गेला ॥ ३ ॥

नच शोधिता गुणित होतो
शोधून पहाता विलीन होतो ॥ ४ ॥

स्व-सूत्राचा शोध लागतो
मी-पणाचा अर्थ उमजतो ॥ ५ ॥

एकच सांगतो अरे मित्रांनो
शोधूनी पहा रे शोधूनी पहा ॥ ६ ॥

शोध घेता शोध लागतो
बघता बघता बोध उगवतो ॥ ७ ॥

बोधाचे ते सूत्र सुबोध
शोधण्यातच होतो बोध ॥ ८ ॥

ना पद्धती असे ना मार्ग असे
स्वनिरीक्षणातच अर्थ असे ॥ ९ ॥

स्वनिरिक्षणाचा अर्थ कळो
घटी घटी तो उजेड उजळो ॥ १० ॥

❁ ❁ ❁


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# मन

गलबला मनाचा, विरोनिया गेला
साराचे ते सार, उतरता मनी ॥१॥

मन विरताच, नि:शब्द सुनामी
मुक्याची कहाणी, झाली असे ॥२॥

अनात्म खुलासा, झाला असे मना
अस्तित्व विनोद, जीवघेणा ॥३॥

जन्म-मृत्यूचे अज्ञान, दु:खाचे कारण
अवघ्या येरझारा, मन संमोहन ॥४॥

मनाच्या संगती, सर्वांची फजिती
मनाची समाप्ती, संतांचे संगती ॥५॥

मनाचा खुलासा, होवो सर्व मना
आणिक मागणे, काही नाही ॥६॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ब्रह्ममयता

काय ते हित, नि काय अहित,
मज न माहीत, पांडुरंगा ॥१॥

अविद्येचा पुतळा, अज्ञानाचा गोळा,
परि तुझा लळा, मज देवा ॥२॥

वासनेचा पूर, इंद्रिय ती चोर,
झालो बघ ठार, पांडुरंगा ॥३॥

अशांत ते मन, मग सुख कुठून
सुख ते शोधून, थकलो देवा ॥४॥

सुख ते शोधिता, दु:ख आले हाता
करु काय आता, पांडुरंगा ॥५॥

कसा घेऊ शोध, कर मज बोध
मती माझी शुद्ध, कर देवा ॥६॥

अनेक साधना, केल्या त्या रे नाना
परि गाठ ज्ञाना, पडली नाही ॥७॥

सद्‌गुरु भेटता, आली निर्विकल्पता
मन ते विरता, फत्ते झाली ॥८॥

कृपा अशी झाली, अहंता फिटली
अंतरी अनुभवली, ब्रह्ममयता ॥९॥

❁ ❁ ❁


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# साक्षी

झाले मना साक्षी मन, दग्ध विकारांची खाण
तुटता द्वैताचे बंधन, प्रकटे मोक्ष आपोआप ।।१।।

तेथे करणे वाऊगे, मन होवो ते बा उगे,
उगे होता ते मन, प्रकटे मोक्ष आपोआप ।।२।।

साक्षी अध्यात्माची खूण, साक्षी संतांची ती जाण,
साक्षी जीवाचे कल्याण, प्रकटे मोक्ष आपोआप ।।३।।

करण्या दु:खाचे खंडण, तुटण्या भवाचे बंधन,
जाता साक्षीला रे शरण, प्रकटे मोक्ष आपोआप ।।४।।

जाण मनाची रे सोय, तेथे उपाय तो अपाय
धरता साक्षीचे पाय, प्रकटे मोक्ष आपोआप ।।५।।

खुंटो जिंकण्याची धाव, सुटो जीवाची ती हाव,
सुटता पलायन राव, प्रकटे मोक्ष आपोआप ।।६।।

दृष्टि प्रकटता नवीन, दग्ध झाले ते दु:स्वप्न,
होता साक्षीचा तो जन्म, प्रकटे मोक्ष आपोआप ।।७।।

होवो मायेचा तो नाश, तुटो आशेचे ते पाश,
होता साक्षीचा प्रकाश, प्रकटे मोक्ष आपोआप ।।८।।

तुटता कल्पनांचे तार, भविष्य झाले पसार,
होता भुतांच्याही पार, प्रकटे मोक्ष आपोआप ।।९।।

सुटो अविद्येचा फास, संपो अनादि तो भास,
घडो साक्षीचा सहवास, प्रकटे मोक्ष आपोआप ।।१०।।

भेटता सद्‌गुरु थोर, कळे अध्यात्माचे सार,
थांबता मनो व्यापार, प्रकटे मोक्ष आपोआप ।।११।।

संपले स्वप्नाचे भास, झाला सुषुप्तीचा ऱ्हास,
पसरता तुर्येचा प्रकाश, प्रकटे मोक्ष आपोआप ।।१२।।

❁ ❁ ❁


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# स्वसंवाद

भक्तीची ती रीत, नाही बा माहित
देवा माझे हित, सांगा तुम्ही ॥१॥

काय आता करू, कोणाला विचारू
कैसे मी आचरू, सांगा मला ॥२॥

नाना पंथ पाहून, मती गेली भ्रमून
माझे ते कल्याण, सांगा देवा ॥३॥

असंख्य त्या साधना, गुरु ग्रंथ नाना
मला बा उमजेना, हित माझे ॥४॥

कोणी म्हणे काही, कोणी म्हणे बाही
म्हणून पहा बिही, चित्त माझे ॥५॥

भक्तीच्या त्या बळे, कैसे ते आकळे
उघडून सांगा सगळे, देवा मला ॥६॥

कैसा अहंकार, होतो निराकार
कोडे ते अपार, मना माझ्या ॥७॥

खूप मी शोधले, नच गवसले
पहा पहा भ्रमले, मन माझे ॥८॥

कुठे ते पावावे, कैसे ते शोधावे
सांगा बा आघवे, रहस्य मला ॥९॥

देव असती खूप, पंथही अमूप
ब्रह्म एकरुप, व्हावे कैसे ॥१०॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

प्रश्न हा ऐकून, मन झाले मौन
गेले ब्रह्म होऊन, अंतरंगी ॥११॥

मन होता मौन, आकळे ब्रह्मज्ञान
संतांचं सांगणं, हेचि आहे ॥१२॥

संतसंगी जाऊन, मौन व्हावे मन
मग ब्रह्मज्ञान, आपोआप ॥१३॥

मन होता मौन, होशील गगन
तेचि ब्रह्मज्ञान, मना माझ्या ॥१४॥

मनी यावी जाण, व्यर्थ आहे मन
हेचि बा साधन, मना माझ्या ॥१५॥

मन होता मौन, घडे मनाचे मरण
मनाचे मरण, सूत्र आहे ॥१६॥

भजन पूजन, ते मौनाचे साधन
न साधता मौन, भक्ती नाही ॥१७॥

संतांचा निरोप, सांगितला अमूप
मन हेचि पाप, मना माझ्या ॥१८॥

❁ ❁ ❁


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# अध्यात्म

अध्यात्माच्या नावे, चालेल बा पूजा
पण कामनांचा बोजा, वाढू नये ॥१॥

अध्यात्माच्या नावे, चालेल बा उपवास
पण आशेचा तो फास, ढिला व्हावा ॥२॥

अध्यात्माच्या नावे, चालेल बा हवन
पण मनी इच्छा असणं, चूक आहे ॥३॥

अध्यात्माच्या नावे, चालतील माळा
पण विचारांचा चाळा, असावा कमी ॥४॥

अध्यात्माच्या नावे, चालेल गुरु करणे
पण सद्‌गुण वाढवणे, घडो तेथे ॥५॥

अध्यात्माच्या नावे, द्यावे बा दान
पण नाव ते कोरणं, योग्य नाही ॥६॥

अध्यात्माच्या नावे, असावा तो झेंडा
पण संकल्पाचा मेंढा, मरावा आधी ॥७॥

अध्यात्माच्या नावे, चांगला भगवा वेष
पण मनी रागद्वेष, नसावा तेथे ॥८॥

अध्यात्माचे नावे, चांगले तीर्थी जाणे
पण नि:स्वार्थ असणे, सार आहे ॥९॥

अध्यात्माच्या नावे, चांगलं साधना करणं
पण मन निष्काम असणं, अट आहे ॥१०॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

न जाणता हे मन, साधना ती करणं
मग आधीचेच गुण, दृढ होती ॥११॥

सार ते अंतरी, ठेवले आहे देवे
पण मनाचे ते कावे, ओळखावे आधी ॥१२॥

करता मनाचे निरीक्षण, जाते ते विरून
मनाचं ते विरणं, सार आहे ॥१३॥

न विरता मन, कैसे देवाचं भेटणं
मन संपूर्ण विरणं, सूत्र आहे ॥१४॥

मन विरून जाणं, तेच भक्तीचं वर्म
ध्यान पूजा कर्म, त्याचसाठी ॥१५॥

❉ ❉ ❉


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# वेदांत

दिसतो जगात, अध्यात्म धुराळा
पण त्या कळीकाळा, खंड नाही ॥१॥

मन इंद्रियांचा वीट, तीच अध्यात्माची वाट
ब्रह्म सरळसोट, आहे बा जगती ॥२॥

काही न करता, येते ब्रह्म हाता
मन इंद्रियांची वार्ता, सरावी लागे ॥३॥

नाना त्या साधना, त्याच बा वासना
साधना वासना, बंधन आहे ॥४॥

जे मूळ बा असे, ते शोधावे कैसे
हेचि मना पिसे, भरावे लागे ॥५॥

पिसे होणे मन, तेचि अध्यात्म लक्षण
ब्रह्मत्वी पावणं, उरफाटं आहे ॥६॥

शाबूत ठेवून मन, ब्रह्मासी शोधणं
सर्वत्र वेडेपण, भरले दिसे ॥७॥

इंद्रिय आणि मन, अधम बा दोन
तेथे तादात्म्य तुटणं, सूत्र आहे ॥८॥

ऐका संतांचे मत, सांगतो कानात
मन इंद्रियांचा अंत, वेदांत आहे ॥९॥

❊ ❊ ❊


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

## ब्रह्म

स्वप्न सुषुप्तीत जागणे,
तेचि ब्रह्ममय होणे ॥१॥

ब्रह्मानंदी जो वसे,
सर्व तया ब्रह्म दिसे ॥२॥

जो मन इंद्रिया विटला,
सर्वाठायी ब्रह्म त्याला ॥३॥

जो गेला उन्मनी,
तेथे न उरे दुजा कोणी ॥४॥

जाणता अनुभवाची व्यर्थता,
प्रकटते ब्रह्ममयता ॥५॥

जो अंतरंगी निरसला,
सर्व दिसे ब्रह्म त्याला ॥६॥

जयाने पैलतीर पाहिला,
भेदभाव नाही त्याला ॥७॥

जो अंतरी ब्रह्मरुप होय,
तेथे खुंटे द्वैताचा उपाय ॥८॥

आता दिसे जे काही,
ते ब्रह्माविण दुजे नाही ॥९॥

ब्रह्म प्रवेशता अंतरात,
द्वैतावर झाली मात ॥१०॥

स्वप्न सुषुप्तीत येता जाग,
ब्रह्म झाले सर्व जग ॥११॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# मन

मन पहा ठक, करे भक्तीचे नाटक
वासना भौतिक, अंतरी त्यांच्या ॥१॥

स्वार्थाच्या कल्पना, मनी इच्छा नाना
मग पूजा भजना, अर्थ नाही ॥२॥

इच्छा मनी असता, सरेच ना चिंता
वासनेच्या चित्ता, सुख कैसे ॥३॥

वासनेच्या पोटी, साधनेच्या गोष्टी
वासनेची आटी, सूत्र आहे ॥४॥

सरेना वासना, म्हणून दुःख नाना
देवा या मना, जाग येवो ॥५॥

मन आणि मोहो, भिन्न नाही दोहो
मना पायी टाहो, नशिबी आला ॥६॥

ऐशा मनाच्या नादी, लागू नका कधी
मनासारखा भेदी, नाही दुजा ॥७॥

मनाची ऐसी समज, मना येवो आज
मनाचे मुद्दल व्याज, सरो देवा ॥८॥

सरता ते मन, भेटे नारायण
अन्य ते साधन, नाही तेथे ॥९॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# धर्म

विझले ते मन, प्रकटले ज्ञान
काहीच साधन, न लगे तेथे ॥१॥

ज्ञानाची रीत, संतांना माहीत
साधनेची बात, नाही तेथे ॥२॥

करता साधना, मन ते विरेना
करणे साधना, जीवभाव ॥३॥

उलट ही बात, मग कैसे हित
गुंतता साधनेत, वाढे अहम् ॥४॥

अहम्‌ची वाढ, सर्वत्र तेढ
धर्माचे बाढ, वायां गेले ॥५॥

धर्माच्या नावाखाली, युध्दे ती लढली
पहा कशी झाली, हानी बापा ॥६॥

धर्माचे नाव, पण अधर्माचे पेव
गुंडांचा शिरकाव, धर्मस्थानी ॥७॥

वाताहत होता, कैसी बा शांतता
अंतरी व्याकुळता, वाढली असे ॥८॥

टाकावा तो धर्म, जो न जाणे वर्म
धर्माचे मर्म, संतांपाशी ॥९॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# अद्वैत

मिटली 'मी'ची धारणा
उगवली अद्वैताची पहाट ॥ १ ॥

शांत झाल्या मनोवृत्ती
थांबला कलकलाट ॥ २ ॥

होता पंचस्कंधांचे आकलन
झाली मी-पणाची बोळवण ॥ ३ ॥

मी-पणाची कळ
सगळा पंचस्कंधांचा खेळ ॥ ४ ॥

पंचस्कंध होता शांत
थांबे मी-पणाचा आकांत ॥ ५ ॥

मिटता धारणा 'मी'ची
शांत झाल्या चित्तवृत्ती ॥ ६ ॥

आता धागा धागा उकलला
चित्त प्रवाह थांबला ॥ ७ ॥

आता कुठे जाणे नाही
नसे असण्याविण दुजे काही ॥ ८ ॥

वस्तूची वस्तूशी अखंड भेट
न होणे आता ताटातूट ॥ ९ ॥

असा उकलला गुत्ता
भुतामाजी भगवत्ता ॥ १० ॥

❊ ❊ ❊



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# अनुभवामृत

सुटो मानपान, सुटावे कांचन
सुटावे ते मन, तेचि जिवाचे कल्याण ॥१॥

सुटो दारापुत्र, सुटो ते चरित्र
मनी असावा मात्र, अनंताचा ध्यास अहोरात्र ॥२॥

सुटो चारी वाचा, जो गुण आकाराचा लोच्या
नादी लाग सद्‌गुरुच्या, विरण्या गाठी मनाच्या ॥३॥

बघ त्या कल्पना, बघ त्या वासना
पाहता त्या मना, त्यांचे अस्तित्व उरेना ॥४॥

पंथ आणि परंपरा, यांचा उलगडो तो दोरा
ब्रम्ह येतसे घरा, सुटता मनाचा पसारा ॥५॥

ब्रह्ममयतेची घोषणा, तीही विसर रे मना
अविद्येच्या साऱ्या खुणा, विरू दे रे मना ॥६॥

मग ब्रह्मज्ञानही जिरतं, ज्ञान अज्ञान विरतं
असण नसण संपतं, तेचि अनुभवामृत ॥७॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ध्यान

जाणून स्वत:स, जाण अस्तित्वास
संतांचा तो सहवास, त्याचसाठी ॥१॥

स्वत:स न जाणता, मनी मोठी अहंता
त्याची होय फजिता, मृत्यूसमयी ॥२॥

सामोरता मृत्यूस, जीव कासावीस
मग याच्या दु:खास, सीमा नाही ॥३॥

मरतो तो कोण, कोणास मरण
याचे नाही ज्ञान, गधडा तो ॥४॥

ऐसा हा गधडा, होई पिसा वेडा
मरणाचा उलगडा, ज्यास नाही ॥५॥

जाणून पिंडास, जाण ब्रह्मांडास
उल्लंघून मरणास, अमर व्हावे ॥६॥

ऐसे स्वत:स जाणणे, जीवभाव संपणे
देही ब्रह्म होणे, हेचि ध्यान ॥७॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# स्वरुप बोध

स्वरुपाचा बोध, होतसे स्वरुपाला
परि त्याची अनुभूती, सांगता नये ॥१॥

मुखी बोलू जाता, अवघीच अपूर्णता
जरी वाचे सांगितले, आपले अर्थ आपण घेतले ॥२॥

देणे घेणे हा व्यवहार, तेथे नाही ती सोय
आपुले आपण विझणे, तेव्हा त्याची प्राप्ती होणे ॥३॥

गुरुचिया बोला, विझू द्यावे आपुल्याला
जो पूर्णतया विझला, तो ब्रह्मपदी पावला ॥४॥

जो विझण्याला भ्याला, तो भवचक्री ठेला
दृढ करता माझ्या 'मी'ला, ब्रह्मपदाला मुकला ॥५॥

सोपी सांगतो खूण, जेथे पावे तो निर्गुण
अवधानी विझू द्यावे मन, मग प्रकटे निर्वाण ॥६॥

गुरुचिया बोला, अवधानी अनुभव संपला
तेव्हा आपोआप झाला, स्वरूपाचा बोध स्वरूपाला ॥७॥

❁ ❁ ❁


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

## निष्कामता

मी आहे कोण, काढावे शोधून
तयासीच ज्ञान, म्हणती ज्ञानी ॥१॥

कैसे होई ज्ञान, प्रश्न आहे छान
विचारावा आपण, आपल्यासी ॥२॥

पुस्तकी ती माहिती, तेथे नसे प्राप्ती
उगाच बा फजिती, माहिती आहे ॥३॥

आणि त्या पुण्याने, ज्ञान नाही होणे
पुन्हा जन्म घेणे, पडे येथे ॥४॥

श्रद्धेच्याकारण, नच होते ज्ञान
आपलेच संमोहन, आपल्यासी ॥५॥

जप तप दान, ते अवघेच बंधन
कर्ता दृढ होणं, आहे तेथे ॥६॥

कोणतीही साधना, पावेच ना ज्ञाना
मनाचा धिंगाणा, साधना आहे ॥७॥

केवळ श्रवण वाचन, तेथे नसे ज्ञान
पाठांतर करणं, ज्ञान नाही ॥८॥

आणि ती सात्त्विकता, ती स्वर्गाचीच कथा
पुण्य ते संपता, येणे पडे ॥९॥

कोणत्याही कर्माने, ज्ञान नाही होणे
कर्त्याचे विरणे, सूत्र आहे ॥१०॥

वरकरणी योगाचा, उपयोग नाही साचा
निरोध बा चित्ताचा, योग आहे ॥११॥



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

कोणताही विधी, ती कर्त्याचीच वृद्धी
विधीतली बुद्धी, अंध आहे ॥१२॥

नाम ते घेता, प्राप्त एकाग्रता
निष्काम नसता, ज्ञान नाही ॥१३॥

कर्मकांडी अडकणे, ते द्वैताचेच गाणे
द्वैती बा रमणे, अज्ञान की ॥१४॥

भक्तीची ती गोळी, बाब ना वेगळी
भिकाऱ्याची झोळी, भक्ती येथे ॥१५॥

कोणतीही प्रार्थना, तेथे बा पोहोचेना
मागणाऱ्या मना, ज्ञान नाही ॥१६॥

पूजा ती करणं, ते इच्छेच्याकारण
इच्छेला का ज्ञान, झाले कधी ॥१७॥

कीर्तन भजन, ते अवघेच रंजन
न संपता मन, कीर्तन नाही ॥१८॥

भगवे घालणं, ते दंभाचे लक्षण
वेगळेपण मिरवणं, अध्यात्म नाही ॥१९॥

गंध आणि माळा, तो बाहेरचाच चाळा
इच्छेचा तो मळा, जळो आधी ॥२०॥

डोक्याचे मुंडन, ते प्रतीक बा जाण
मेंढयांना का ज्ञान, झाले कधी ॥२१॥

गाठणे ते वन, नाहीच ते ज्ञान
मनाचे उन्मन, वन आहे ॥२२॥

व्यर्थ तीर्थाटन, नि व्यर्थचि स्नान
मन विरल्याविण, यात्रा नाही ॥२३॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

कपडे ते काढून, होत नाही ज्ञान
सुषुप्तीत जागणं, ज्ञान आहे ॥२४॥

आश्रम तो स्थापणं, आहे ते अज्ञान
ज्ञानाचं देणं घेणं, घडलेचि नाही ॥२५॥

निष्काम ते मन, तेच पात्र जाण
निष्काम आणि ज्ञान, भिन्न नाही ॥२६॥

जो निष्काम सर्वत्र, तोच ज्ञाना पात्र
निष्कामतेचे सूत्र, गीतेमाजी ॥२७॥

निष्काम होता मन, प्रकटते ज्ञान
ही निष्कामतेची शिकवण, सर्वांसाठी ॥२८॥

❀ ❀ ❀


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# आत्मबोध चालिसा

आत्मबोधाची आठवण, करुन देती संतजन
आत्मबोधाविण कल्याण, नाही नाही ॥१॥

आत्मबोध उगवे कैसा, प्रश्न पडो हा खासा
घेणे आत्मबोधाचा वसा, कल्याणकारी ॥२॥

आत्मबोधाची ती आस, होवो सर्व जनास
अज्ञानाचा मग निरास, आपोआप ॥३॥

सगुण साकाराची सिद्धी, ती बालकाची बुद्धी
नामरूपाची ती उपाधि, जाईच ना ॥४॥

घडता नामरूपाचा त्याग, प्रकटे आत्मबोधाची बाग
मग येतसे ती जाग, आपली आपल्या ॥५॥

व्रत भजन नाम कीर्तन, उपवास नि तीर्थाटन
याव्दारे मनाचे शुद्धीकरण, संत शिकविती ॥६॥

पूजा विधि उपासना, ग्रंथ पंथ गुरु नाना
या सर्व उपाय योजना, मनशुद्धीच्या ॥७॥

तुम्ही असा हिंदु वा मुसलमान, बौध्द, ख्रिश्चन वा जैन
शिक्षित अशिक्षित वा कोणीपण, सर्वा ज्ञान हेच आहे ॥८॥

धर्मा धर्माच्या भिंती, ती अंध अज्ञानाची कृती
भेदा भेदाची वृत्ती, अज्ञाना पायी ॥९॥

भेदा-भेदाची ही वृत्ती, जी मनाचीच कृती
म्हणून मनाची निवृत्ती, कल्याणकारी ॥१०॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

मनच असे मूढपण, मनच लबाड अज्ञान
मनाची अशी ती जाण, येवो सर्वा ॥११॥

उमजता मनाचे हे खेळ, आत्मबोधास नाही वेळ
संपता मनाची वळवळ, प्रकटे आत्मबोध ॥१२॥

म्हणून चित्तशुद्धीविण, ग्रंथ पारायण अज्ञान
चित्तशुद्धीतून प्रकटन, आत्मबोधाचे ॥१३॥

होण्या आत्मबोध प्रकटन, जावे संतांना शरण
बायबल वेद कुराण, ग्वाही देती ॥१४॥

संतांना शरण जावे, साक्षीभावाचे सार घ्यावे
फोलपटा फेकून द्यावे, त्या नाव भक्ती ॥१५॥

प्रथम मनाचे सात्विकीकरण, द्वितीय ते मनस्थिरीकरण
तिसरे मनशुद्धीकरण, भक्ती चौथी मनोलय ॥१६॥

पहिली भक्ती कळसदर्शन, दुसरी प्रदक्षिणा घालणं,
तिसरी गाभ्यात जाणं, ब्रह्ममयता भक्ती चौथी ॥१७॥

जर न समजले हे सार, मग सर्व उपासना असार
उगाच ग्रंथाचा तो भार, गाढवा शिरी ॥१८॥

शुद्ध व्यवहार हाच धर्म, शुद्ध आचरण हेच कर्म
त्याविण भक्तीचे वर्म, हाता न ये ॥१९॥

नाही जेथे शुद्ध व्यवहार, अशुद्ध मनाचा आचार
वर वर भक्तीचे अवडंबर, ती भक्तीच नाही ॥२०॥

आत्मबोधाचे हे सार, अमृतानुभवी सांगती ज्ञानेश्वर
संपता चार वाचांचा व्यापार, प्रकटे आत्मबोध ॥२१॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

माऊली ज्यास म्हणे वाचा, तो उल्लेख असे मनाचा
संपता व्यापार मनाचा, आत्मबोध प्रकटे ॥२२॥

मनाच्या समग्र लयाविण, काहीच न शिकवती संतजन
विरता मनाचे मनपण, आत्मबोध प्रकटे ॥२३॥

हिंदु मुस्लीम वा जैन, असो आस्तिक वा नास्तिक जन
लयास जाता ते मन, आत्मबोध प्रकटे ॥२४॥

नसता मनोलयाची जाण, सर्व उपासना द्वैत अज्ञान
द्वैती आत्मबोध प्रकटन, नाही नाही ॥२५॥

जगी दिसे अध्यात्माची लाट, पण तो अवघा बाजारहाट
मनोलयाची ती वाट, तेथे नाही ॥२६॥

गुरु हजारो नि लाखानं, पण आत्मज्ञान स्पर्शाविण
यांनाच नसे अद्वैत जाण, मग शिष्या ज्ञान कैचे ॥२७॥

असणे आश्रमाचा पसारा, मग गुरु क्वचितच खरा
दिडी सवाईच्या व्यवहारा, आत्मज्ञान नाही ॥२८॥

बहुतेकांचं शिष्यत्वच खोटं, त्यांना तशाच गुरुची भेट
ऐसी दोन अज्ञान्यांची मोट, तेथे अध्यात्म खोटं ॥२९॥

जेथे चाले अद्वैत निरुपण, मनोलयाचे जे प्रवचन
आढळता ऐसे लक्षण, तोच संतसंग जाणिजे ॥३०॥

अवघ्या त्या साधना, ज्या बहिरंग उपासना
दृढ करिती द्वैतबंधना, मग आत्मबोध कैसा ॥३१॥

जर तुवा आत्मबोधाची आवड, मग अंतरंग साधना निवड
सुख शांतीचे कवाड, मग उघडे आपोआप ॥३२॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

जाण्या सुखशांतीच्या गावा, आत्मज्ञानी गुरु हवा
जाणणे मग त्या परमानुभवा, आपसूक होई ॥३३॥

शिष्याचं शंभर नंबरी असणं, जे खऱ्या शिष्याचं लक्षण
मग खऱ्या गुरुचं भेटणं, आपोआप ॥३४॥

अध्यात्माचे हे सार, उमजो जीवांना सत्वर
जाता मनाच्या त्या पार, आत्मबोध प्रकटे ॥३५॥

होण्या मनाचा निरास, आचरावे निष्काम कर्मास
संपता कामनांचे भास, आत्मबोध प्रकटे ॥३६॥

लागो आत्मबोधाचा लळा, पिको आत्मज्ञानाचा मळा
संपता मनोव्यापाराचा घोटाळा, प्रकटे आत्मबोध ॥३७॥

अंतरंगी बुडी मारा, तेथे सापडे तो हिरा
वाढवणे मायेचा पसारा, ते वेचणे गाराच की ॥३८॥

उमजो आत्मबोध चालिसा, तुटो मनाचा तो फासा
घेणे आत्मबोधाचा वसा, कल्याणकारी ॥३९॥

सर्व जीवांना आत्मबोध होवो, स्वरूपाचे स्मरण येवो
ब्रह्म प्रेमसुख अनुभवो, अखिल विश्व ॥४०॥

❈ ❈ ❈


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# प्रचिती

जाणून निर्गुण, पूजावा सगुण
ज्ञानेश्वरीत माऊलीनं, सांगितलं आहे ॥१॥

नाम ते घेऊन, साधावे कल्याण
पण निष्काम मन, अनिवार्य आहे ॥२॥

पूजा ती कशाला, माहीत न कोणाला
स्वार्थापायी देवाला, भजला आहे ॥३॥

अज्ञानाकारण, न समजले वचन
सर्वत्र अज्ञान, भरले आहे ॥४॥

एकाग्र होण्या मन, पूजा हे साधन
पण भलतेच समजून, गेले बा वाहून ॥५॥

करणे देवाची स्तुती, ती अज्ञानी कृती
द्वैतातली भक्ती, अज्ञान आहे ॥६॥

जर स्तुती ती ऐकून, देव प्रसन्न होणं
मग खुशामतखोर भगवान, सामान्य आहे ॥७॥

एकाग्र होण्या मन, पूजावा भगवान
मन अंतर्मुख होणं, सूत्र आहे ॥८॥

होता निष्काम मन, शक्य मनशुद्धीकरण
मन निष्काम होणं, पूजाच आहे ॥९॥

निष्कामतेकारण, रागद्वेषाचं निरसणं
रागद्वेषाचे निरसणं, रहस्य आहे ॥१०॥

ऐसे रागद्वेष निरसती, पाप पुण्य बा संपती
मग मोक्षाची प्रचीती, अंतरी येते ॥११॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# मोक्ष

निर्गुण निराकार, तोचि साक्षात्कार
गुण आकारापार, तत्त्व आहे ॥१॥

गुणाची आवड, आकाराची चाड
अहम् ची धडपड, जीव आहे ॥२॥

इच्छा नि वासना, नाना त्या कल्पना
मग जन्ममरणा, खंड नाही ॥३॥

शरीर आवडणे, इंद्रिय चाळवणे
मनी आस असणे, भवचक्र ॥४॥

मनाचा आभास, अज्ञान ते खास
मनाचा निरास, ज्ञान आहे ॥५॥

सदगुरु भेटता, जाणता मन व्यर्थता
मनाची सांगता, आपोआप ॥६॥

समज ती येणे, मन ते सरणे
सद्‌गुरुकारणे, मोक्ष आहे ॥७॥

❉ ❉ ❉


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# ज्ञान

देवा तुझी आन, जगी लोपले रे ज्ञान
आता जीवाचे कल्याण, कैसे व्हावे ? ॥१॥

सान्या संतांची शिकवण, विसरले रे जन
आता मनाचे संवर्धन, ठायी ठायी ॥२॥

मनाचे उत्थान, दु:खाची ती खाण
मनाचे विसर्जन, ज्ञान असे ॥३॥

मनाचे विसर्जन, शिकवती संत जन
मनाचे संवर्धन, अज्ञान असे ॥४॥

होता मनाचे विसर्जन, प्रकटते आत्मज्ञान
मनाचे निर्विकल्प निरीक्षण, सूत्र असे ॥५॥

संत असती रे साक्षी, तुटो तादात्म्य मनाशी
मग गाठ आपल्याशी, आपलीच पडे ॥६॥

असा खुलासा आपला, होता तो आपल्याला
जाता तडा त्या जीवाला, ज्ञान होई ॥७॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# भेट

वासना मनीच्या, पहा त्या निवाल्या
उत्तेजना सर्व, कशा शांत झाल्या ॥१॥

आता प्रतिक्षण, जी आहे दिवाळी
भय-चिंताची, पहा झाली होळी ॥२॥

आशा नि ईर्षा, कायमच्या पळाल्या
कामना मनीच्या, कधीच्या जळाल्या ॥३॥

आता अंतरी, प्रभु प्राप्त झाला
भास तो मीपणाचा, पहा तो विराला ॥४॥

भाग्य ते उजळले, गुरुकृपा जाहली
विश्व माझी छबी, मी अंतरी पाहिली ॥५॥

मीच विश्व आता, प्रचीती प्रकटली
पाहता पाहता, पहा भेट झाली ॥६॥

❁ ❁ ❁



For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

## प्रार्थना

संतवाणीचा अर्थ कळो
अवधानाचा दीप उजळो
तमस मनाचे राज्य पळो
संस्कारांचे लेप गळो ॥ १ ॥

तृप्तीचे ते रहस्य कळो
अविद्येचे आवरण जळो
प्रज्ञेचा तो दीप उजळो
मनोबंधाच्या बेडया गळो ॥ २ ॥

बेहोषीची रात्र टळो
मुक्तीचा तो अर्थ कळो
जिवनाचाही अर्थ कळो
आनंदाचा सुगंध दरवळो ॥ ३ ॥

मृगजळाचा भास टळो
दु:खाचे ते कारण कळो
मी-मनाचा अर्थ मिळो
निजबोधाशी गाठ पडो याच देही ॥ ४ ॥

❁ ❁ ❁

## कैवल्य

तत्त्व असे ते अनंत महत्तम
सघन हित ते प्रकट होतसे
पंचभूते ही त्यातून उठती
अखिल विश्व मग रूप घेत असे ॥ १ ॥

मीपण अवघे विश्वात्मक ते
सद्‌वस्तू नि 'मी' पण एकच असे रे
ब्रह्म म्हणती ते स्वरुप असे रे
आत्मवस्तू तेचि ज्ञान असे रे ॥ २ ॥

कुणी म्हणती दर्शन त्याते
कुणा साठी ते प्रकाश असे
प्रकाश दिव म्हणूनी देव तत्त्व ते
अवघे शब्दांचे फेरफार ते ॥ ३ ॥

तत्त्व नि शब्द भिन्न असे ते
शब्दी अडकता बंधन बनते
शब्द सुटता तत्त्व प्रकटते
तत्त्व प्रकटता द्वैत ते सरते ॥ ४ ॥

तत्त्व प्रकटण्या सत्संग मार्ग रे
सद्‌गुरुचा सत्संग धरा रे
त्या सत्संगात 'मी'पण विरते
कैवल्य मग शिल्लक उरते ॥ ५ ॥

❁ ❁ ❁


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

# वेदना (अनुभव)

वेदना मायेचे प्रतिक
वेदना संस्कारांचे रूप
वेदना अविद्येचे प्रतिरूप
वेदना सर्वस्वी स्व स्वरूप ॥ १ ॥

वेदना सर्व दुःखाचे माध्यम
वेदना मोहमायेचे गोदाम
वेदना संमोहनाचा सापळा
वेदना भासाचा भोपळा ॥ २ ॥

वेदना चित्शक्तीचा खेळ
वेदना भवभ्रमाचा कल्लोळ
वेदना नामरूपाचे कारण
वेदना भोगाचे आमंत्रण ॥ ३ ॥

वेदना अहम् निर्मितीचे कारण
वेदना पिंडाचे आवरण
वेदना अखिल जगत स्वरूप
वेदना ब्रह्मांडाचे रूप ॥ ४ ॥

वेदना सदैव नित्यनूतन
वेदना स्वयंभू स्वकारण
वेदना फसवी जगताला
वेदना भूलवी मनाला ॥ ५ ॥

वेदना संज्ञेचे बाळ
वेदना संज्ञेचेही आजोळ
वेदना व्यक्त अव्यक्ताचा मेळ
वेदना भवचक्राचे मूळ ॥ ६ ॥

वेदना संपूर्ण आभास स्वरूप
वेदना ब्रह्मांडाचे खरे रूप
वेदनेची पटो ओळख
वेदनेचा हरो काळोख ॥ ७ ॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

वेदना बंधमुक्तीचे कारण
वेदना जन्म मृत्यूचे संचालन
वेदना सृष्टीरूपी साकार
वेदना मृगजळाचा आकार ॥ ८ ॥

वेदनेचे स्वरूप ओळखा
वेदनारुपी चक्रव्यूह जोखा
वेदनेचा ओळखा डाव
वेदनेचा जाणा काव ॥ ९ ॥

वेदना साधनेचे साधन
वेदना तपश्चर्येचे तपोवन
वेदना अध्यात्माचा प्राण
वेदना मुक्तीचा महामंत्र
वेदना निर्वाणाचे तंत्र ॥ १० ॥

वेदना जाणणे वेदनेची बोळवण
वेदना जाणणे वेदनेची दाणादाण
वेदना जाणणे निजबोधाचे वळण
वेदनेची समूळ जाण हेचि संप्रज्ञान ॥ ११ ॥

वेदनेचा अंत मायेचे निर्गमन
वेदनेचा अंत आस्त्रवांचे बाष्पीभवन
वेदनेचा अंत प्रतिमाचे निराकरण
वेदनेचा अंत प्रज्ञचे प्रकटन ॥ १२ ॥

वेदनेचा लय प्रश्रब्धीचा समय
वेदनेचा लय करुणेचा उदय
वेदनेचा लय मैत्रीचे आलय
वेदनेचा लय मुदिता वलय ॥ १३ ॥

वेदना संपे तेथे वेदांत
वेदना सरे तेथे गीता
वेदना न उभरे तेथे कुराण
वेदनेची उकल तेची बायबल ॥ १४ ॥


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

वेदना बुद्धाचा धम्म
वेदना शंकराचार्यांची माया
वेदना महावीराचा प्रमाद
वेदना कबीराचा घुंघट ॥ १५ ॥

वेदना जाणो वेदनेला प्रतिक्षणा
वेदना चरणी हीच प्रार्थना
वेदनेत घडो वेदनेचे जागणे
वेदनेत जागणे तेचि ब्रह्ममय होणे ॥ १६॥

❉ ❉ ❉

## First Step is the Last Step

Search of God and that too outward
O, God ! that's mad mad World.

What they don't do ? they search in every direction
But except that, which is the only condition.

They have made a mess of it, and really not aware of it
All their attempts are like entering a door, which is not at all there.

They get misguided by their own mind and for infinite lives they cry
But they don't know to manifest God, mind has to die.

To die by itself, mind itself must understand
Then choiceless awareness, is secret key to the pathless land

In choiceless awareness flowers the still mind, that's quantum awake
Intense choiceless awareness of self, that's, first step is the last step.

❉ ❉ ❉


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com

## Reality

Where is I ?
There is God only.

Those who don't know
They are lonely.

There is no happiness
Or unhappiness.

But they do exist
Because there is I-ness.

Both richness and poverty
Are mind ideas only.

For mind, beyond quality
There is only eternity.

All the six senses
They are illusory.

But for ignorants
It is a real story.

Birth and death
They don't exist.

But to realise it
EGO must cease.

Let go the mind
And you are reality.

All other achievements
Are but futility.

❁ ❁ ❁


For Complete Dnyaneshwari Visit : www.esahity.com